# बागल यांच्याकडून विद्यार्थिनींसाठी २५ हजारांची शिष्यवृत्ती

**कोल्हापूर** : विद्यार्थिनींमध्ये सामाजिक कार्याची जाणीव निर्माण होण्यासाठी कॅनडास्थित विश्वासराव बागल यांनी आपली पत्नी कै. सुलेखा बागल यांच्या स्मरणार्थ २५००० रुपयांची शिष्यवृत्ती जाहीर केली. कमला महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ही घोषणा करण्यात आली.

कै. सुलेखा बागल (पूर्वाश्रमीच्या आक्काताई पाटील) या मूळच्या कोल्हापूरच्याच होत्या. आपल्या पत्नीची स्मृती चिरंतन राहावी या उद्देशाने विश्वास बागल यांनी २५००० रुपयांची शिष्यवृत्ती जाहीर केली.

कमला महाविद्यालयात प्रथम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीला ही शिष्यवृत्ती दिली जाईल. या शिष्यवृत्तीची घोषणा नुकतीच महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात करण्यात पारितोषिकांचे विश्वस्त माजी खासदार उदयसिंगराव गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर होते. यावेळी गायकवाड म्हणाले की, विद्यार्थिनींनी शैक्षणिक व क्रीडाक्षेत्रात केलेले कार्य उल्लेखनीय आहे. ताराराणीचा आदर्श घेऊन मुलींनी आपले व्यक्तिमत्त्व आदर्शवत घडवले पाहिजे. यावेळी प्राचार्य क्रांतिकुमार पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी मुडेकर यांनी केले. आभार ए. एन. नरके यांनी मानले.

## गडहिंग्लज येथे आज

पुढारी 15-2-04